Maharashtra State Board
of
Secondary & Higher
Secondary Education
Kolhapur Divisional Board
Kolhapur-416004

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व
उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
कोल्हापूर विभागीय मंडळ,
कोल्हापूर–४१६००४

Ph No. 0231-2696101/2/3 WebSite : www.sscboardkolhapur.in Email: divsec.kop@gmail.com

कोविमं/डीपी/प्रकटन/ 3584
दिनांक - १४/१०/२०२५

प्रति,

मुख्याध्यापक / प्राचार्य,
सर्व मान्यता प्राप्त माध्यमिक शाळा व क.महाविद्यालये,
सातारा, सांगली व कोल्हापूर.

**विषय:- उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षा फेब्रु.-मार्च २०२६ मध्ये आयोजित करावयाच्या परीक्षांच्या तारखांबाबत..**

**संदर्भ :-** राज्यमंडळ, पुणे यांचे पत्र जा.क्र.रा.मं./परीक्षा-६/३४८६ दि.१३.१०.२०२५

फेब्रु.-मार्च २०२६ मध्ये आयोजित करण्यात येणाऱ्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेच्या (इ.१० वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षेच्या तारखांबाबत प्रकटनाची प्रत या पत्रासोबत जोडली आहे. सदर प्रकटनाच्या अनुषंगाने आपल्या शाळेतील व क.महविद्यालयातील सर्व विद्यार्थी व शिक्षकांना परीक्षेच्या तारखांबाबत अवगत करावे व पुढील आवश्यक ती कार्यवाही करावी.

**(सुभाष रा.चौगुले)**
**विभागीय सचिव**
**कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर**

**सोबत: प्रकटन**

# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे ४११ ००४.

विषय– उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी)
फेब्रु–मार्च २०२६ परीक्षांच्या तारखांबाबत...

## ॥ प्र क ट न ॥

---

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने पुणे, नागपूर, छ.संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर व कोकण या नऊ विभागीय मंडळामार्फत आगामी फेब्रुवारी–मार्च २०२६ मधील उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षेच्या लेखी, प्रात्यक्षिक व इतर परीक्षा पुढील तारखांना आयोजित करण्यात येणार आहेत.

| अ.क्र. | तपशील | उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षा कालावधी | माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षा कालावधी |
|---|---|---|---|
| १. | लेखी परीक्षा | मंगळवार, दि. १० फेब्रुवारी २०२६<br>ते<br>बुधवार, दि. १८ मार्च २०२६<br>(माहिती तंत्रज्ञान व सामान्यज्ञान विषयांच्या ऑनलाईन परीक्षेसह) | शुक्रवार, दि. २० फेब्रुवारी २०२६<br>ते<br>बुधवार, दि. १८ मार्च २०२६ |
| २. | प्रात्याक्षिक, श्रेणी, तोंडी व अंतर्गत मूल्यमापन तसेच NSQF अंतर्गत व्यावसायिक अभ्यासक्रम प्रात्यक्षिक परीक्षा | शुक्रवार, दि. २३ जानेवारी २०२६<br>ते<br>सोमवार, ०९ फेब्रुवारी २०२६<br>(माहिती तंत्रज्ञान व सामान्यज्ञान विषयांच्या प्रात्यक्षिक परीक्षेसह) | सोमवार, दि. ०२ फेब्रुवारी २०२६<br>ते<br>बुधवार, दि. १८ फेब्रुवारी २०२६<br>(शरीरशास्त्र, आरोग्यशास्त्र व गृहशास्त्र विषयांच्या प्रात्यक्षिक परीक्षेसह) |

शाळा / कनिष्ठ महाविद्यालय व विद्यार्थी यांना अभ्यासक्रमाचे नियोजन करण्याचे हेतूने तसेच विद्यार्थ्यांच्या मनावरील ताण कमी होण्याचे दृष्टीने फेब्रुवारी–मार्च २०२६ परीक्षेच्या प्रात्यक्षिक व लेखी परीक्षेच्या तारखा वरीलप्रमाणे जाहीर करण्यात येत आहेत.

उपरोक्त परीक्षांचे विषयनिहाय सविस्तर अंतिम वेळापत्रक स्वतंत्रपणे मंडळाच्या संकेतस्थळावर यथावकाश जाहीर करण्यात येईल.

याबाबत सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

दिनांक : १३/१०/२०२५

(प्रमोद गोफणे)
सहसचिव,
राज्य मंडळ, पुणे ४.